प्रकरण पाचवे

# वाङ्मयीन टीकाकार : सर्वज्ञ की रसज्ञ?

प्रकरण पाचवे

# वाड;मयीन टीकाकार : सर्वज्ञ की रसज्ञ ?

कादंबरीचे परिक्षण करताना वा. ल. ना. नेहमी एक प्रश्न पडत असे. आणि तो म्हणजे वाड;मयीन टीकाकार सर्वज्ञ की रसज्ञ? अनेक टीकाकारांच्या टीकेचा अभ्यास करताना देखील त्यांना नेहमी असे उत्तर दूयावेसे वाटायचे की वाड;मयीन टीकाकार हा रसज्ञच असतो. काही मुद्दूयांधारे वाचकांच्या व परिक्षणकारांच्या दृष्टीकोनाधारे या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा वा. ल. प्रयत्न करत आणि त्यांच्या दृष्टीकोणाचा विचार केल्यानंतर वाड;मयीन टीकाकार हा रसज्ञ आहे याचे उत्तर देताना देखील उत्तराचे समर्थन करण्याचा प्रयत्न वा. ल. करतात. वाड;मयीन टीकाकार सर्वज्ञ की रसज्ञ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी वा. ल. ना परिश्रम घ्यावे लागले व सर्वसामान्य वाचकांचा व परिक्षणकारांच्या मतांचा आढावा घ्यावा लागला.

इतरांच्या मतांचा आढावा घेत घेत स्वत:ही ते एक उत्तम समीक्षकच होते. स्वत: जेव्हा ते टीका करीत तेव्हा ते सर्वज्ञ बनून टीका करीत की रसज्ञ बनून तर टीकाकाराला सर्वज्ञ बनून टीका करताना अनेक वाड;मयीन समस्यांना तोंड दूयावे लागते. आणि वाड;मयीन कलाकृतीचे स्वरुपच असे असते की रसज्ञ बनूनच टीका करावी लागते. त्याला सर्वज्ञ तो होऊ शकत नाही. कारण टीकाकार हा ही एक मनुष्य असतो. आणि त्यालाही काही मर्यादा असतात.

वा. ल. टीका करीत असताना नेहमी स्वत:च्या अपूर्णत्वाची जाणीव करुन देतात. टीकाकाराला कोणकोणत्या अडीअडचणींना सामोरे जावे लागते. त्या समस्याही मांडण्याचा प्रयत्न करतात. स्वत:च्या अनुभवाचे उदाहरण देऊन या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा वा. ल. प्रयत्न करतात. वा. ल. परिक्षणकाराच्या कर्तव्याची जाणीव ही करुन देतात. या प्रश्नाच्या उत्तरासाठी अनेक उदाहरणेही आहेत.

कलाकृतीचे परीक्षण टीकाकाराला रसज्ञ बनूनच करावे लागते. कारण कोणतीही वाड;मयीन कलाकृती टीकाकार कोणत्याही साच्यात, आराखड्यात बसवू शकत नाही. वाड;मयकृतीची अंतर्गत संघटना ही अनन्यसाधारण असते. तिच्या अंगप्रत्यंगातून जीवनाचा, चैतन्याचा एकसारखा, साक्षात्कार घडत असतो. आणि म्हणूनच हॅम्लेटचा शोध कधीही संपत नाही. जीवनाचा शोध कधी तरी संपेल का? फुलराणी संदर्भात, हॅम्लेट संदर्भात आराखड्याच्या भाषेत बोलणे कधी तरी शक्य आहे काय ? अशा कलाकृतीचे परीक्षण सर्वज्ञ बनून जर टीकाकाराने आराखड्यात बसविण्याचा प्रयत्न केला तर ती टीका चुकीची होण्याची शक्यता असते.

अराखड्याच्या भाषेत पकडायची म्हटले तरी कलाकृतीला टीकाकार अराखड्यात बसवू शकत नाही. आणि जरी अराखड्यात पकडली तरी ती चुकीची असण्याची शक्यता असते. अशा अनेक समस्यांना टीकाकाराला सामोरे जावे लागते.

टीकाकार वाड;मयकृतीचे परीक्षण करताना त्याच्या हातून रसज्ञतेची आपोआपच प्रक्रिया घडत असते. टीकाकाराला अनन्यसाधारणत्वाचा शोध घेण्यासाठी प्रथम साधारणाचीच कास धरावी लागते. त्याच्याच आधारे पावले टाकावयाची असतात. टीकाकार चाचपडत, चाचपडत पुढे जातो व जे जे हाती लागेल त्याची त्या ललितकृतीवर एकंदर दृष्टीने पहाणी करु लागतो. तिचे ते अंतिम केवलस्य आपणास

जाणवत असते. तिच्या नसानसातून वाहणाऱ्या चैतन्याचे जे रुप आपणांस तिला प्राप्त करुन दिलेले असते. त्यांच्या संदर्भात तिच्यातील आपणांस गोचर होणाऱ्या बारीकसारीक तपशीलाचा अर्थ लक्षात घेणे हाच खऱ्याखुऱ्या टीकेचा उद्‌योग होत असतो. येथे रुप हा शब्द विवेचनाच्या ओघात आला. प्रत्येक जीवंत वस्तू ही मूर्तिमान असते. तिला ज्याप्रमाणे गोचर असा आकार असू शकतो. तसेच मनोगम्य रुपही असू शकते. तिचे तत्सदृश्य इतर जीवंत वस्तू पासूनचे पृथकत्त्व, अनन्यसाधारणत्व, ह्यामुळेच जाणीवेत त्यामुळे कलाकृती संदर्भात रुप हा शब्द जेव्हा आपण वापरतो तेव्हा ज्या ज्या गोष्टींतून तिचा वेगळेपणा व अनन्यसाधारणत्व तिचा जीवंतपणा आपणांस जाणवतो. प्रत्येक श्रेष्ठ कलाकृतीचा शोध हा अनन्यसाधारण असतो. पृथक प्रकृती लक्षात घेऊनच हा तदनुसार शोध घ्यावा लागतो. त्यासाठी एकच एक धोपट मार्ग अनुसरुन चालत नाही. प्रत्येक वेळी त्या मार्गावर अगदी जपून पावले टाकावी लागतात. अशी समीक्षा अडाख्यांच्या भाषेत बोलत नाही.

वाड;मयीन टीका ही शोधक असते. एखाद्‌या वाड;मयकृतीचा शोध हा देखील वाड;मयाची प्रकृती समजून घेण्यासच शेवटी उपयोगी पडत असतो. ही सामान्य वाड;मयकृतीदेखील एका दृष्टीने टीकाबुद्‌धीला आव्हानच देत असते. कारण तिची सामान्यता ही देखील शोधअन्ती लक्षात येणार असते. व ज्याला आपण सामान्यत्व म्हणतो व नीर्जिवपणा म्हणतो ते सामान्यत्व का व तो नीर्जीवपणा कशावरुन हे देखील आपणांस कलामूल्यांचा व वाड;मूल्यांचा शोध घेत असताच ह्याच वृत्तीने खऱ्याखुऱ्या टीकेला पावले टाकावी लागतात. म्हणूनच तिची भूमिका बोधकाची कधीच राहू शकत नाही. ती भूमिका वाड;मयन्तार्गत सत्यांचा शोध घेऊ पाहणाऱ्या शोधकाचीच असावी लागते. शोध म्हणजे कधीही न संपणारी साधना आहे. ह्याची जाण तेथे पदोपदी व्यक्त व्हावी लागते. मग ती टीका आपणासमोर येणाऱ्या एका कृतीची असो. प्रतिभेचा शोध घेऊ पाहणारी असो किंवा अनेक प्रतिभावान मनाची असो ही टीका नम्र असते. कलेला शरण जाऊन केलेली असते. अशा अनेक समस्यांना टीकाकाराला सामोरे जावे लागते. आणि त्याच्या सर्वज्ञतेला बाधा येण्याची शक्यता असते.

टीकाकाराला रसज्ञ बनूनच कलाकृतीचे परीक्षण करावे लागते. कारण कलाकृतीचे स्वरुपच असे असते की रसज्ञ बनूनच टीकाकाराला परीक्षण करावे लागते.

समीक्षा जी आज अनेक प्रश्न उपस्थित करीत आहे ते वाड;मयाच्या प्रकृतीसंबंधी स्थिती गतीसंबंधी, घाटासंबंधी, प्रकारासंबंधीची, घटनेसंबंधीची मूल्यमापनासंबंधीची समज अधिक प्रगल्भ बनत आहे ती आज अनेक प्रश्न उपस्थित करीत आहे. ते सोपे नाहीत ते सोपे समजून ती उत्तरे देण्याचा प्रयत्न बालिशपणा ती करीत नाही. या प्रश्नांची उत्तरे देणे अवघड आहे. याची तिच्या ठिकाणची जाण वाढते आहे. याचे मुख्य कारण असे की, गेल्या पंचवीस, तीस वर्षात कविता, लघुकथा, कादंबरी, नाटक, ललितगद्‌य या वाड;मय क्षेत्रात जे नविन लक्षणीय मराठी लेखन उदयाला आले ते आपल्याबरोबर नाना प्रकारचे नविन प्रश्न घेऊन आले. त्याचे आव्हान स्वीकारणे समीक्षेला सतत भाग पडले. हे आव्हान स्वीकारीत असता आपला वाड;मयविचार अपूरा पडत आहे याची जाण वाढते. अनेक गोष्टींचा नव्याने पुनर्विचार होणे आवश्यक आहे याची जाण आली. वाड;मयीन टीकाकार हा रसज्ञ असतो. कारण के. नारायण काळ्यांची टीका, श्रीपाद कृष्णांची टीका, टीकाकार आजचा, कालचा, उद्‌याचा वाड;मयीन टीका : काही प्रश्न, वाड;मयीन टीका

आणि ललित लेखक वाड;मय समीक्षा माझी भूमिका, मराठी वाड;मयाविचार नविन दिशा, नाट्यसमीक्षा : काही प्रश्न, वाड;मयीन टीकाकार सर्वज्ञ की रसज्ञ? सामान्य वाचक, साहित्य स्वरुप आणि समीक्षा, साहित्य शोध आणि बोध, वाड;मयीन मते आणि मतभेद, वाड;मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन या पुस्तकातून आणि अनेक लेखांतून वा. ल. कुलकर्णी यांनी वाड;मयीन टीकाकार सर्वज्ञ की रसज्ञ? या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

वा. ल. कुलकर्णी यांनी कथा कादंबरी, नाटक, कविता, एकांकिका लघुकथा आशय आणि अभिव्यक्ती, नवे साहित्य, जुने साहित्य मूल्यविचार, प्रकृती, प्रयोजन, सौंदर्य या विषयी आपली मते, मांडली सत्य, शिव, सौंदर्य ललित वाड;मयाची भाषा, नवे कवि जुने कवि, तुलनात्मक साहित्यावर केलेली समीक्षा ललित वाड;मयाची आत्मपरता, निरनिराळे विषय घेऊन, त्यांच्या वाड;मयकृतीची खोलात जाऊन समीक्षा केली. समीक्षा करताना कालखंडाचा विचार केला हे सर्व करीत असताना नकळतपणे ज्या चुका समीक्षेबाबत वा. ल. च्या हातून झाल्या. त्या चुका उघडकीस आणून स्वत:च्या चुकांची ते कबुली देतात. ते स्वत: फार बुद्धिमान आहेत. अशा प्रकारचा आव आणीत नाहीत. स्वत:ला फार मोठे तत्वज्ञ व ज्ञानी समजत नाहीत. त्यांच्या अंगी नम्रता दिसून येते.

समीक्षा करीत असताना वाड;मयाचा रसास्वाद चाखत चाखत ते समीक्षा करतात परंतु ही समीक्षा करताना देखील त्यांना आनंद होतो. आणि हा आनंद चाखत चाखत ते पुढे जातात.

वा. लं. ना. वाड;मयाची आवड बालपणा पासूनच होती. प्रथम ते वाचक होते. पुन्हा ते रसिक झाले. आणि नंतर समीक्षक झाले. रसिकतेतून त्यांनी समीक्षा केलेली दिसून येते. टीकाकार हा सर्वज्ञ असतो. असे ते मानायला तयार नाहीत. झालेल्या चुका न लपविता त्याबद्दल कबुली देण्यातच वा. लं. चा मोठेपणा दिसून येतो. आपण केलेली समीक्षा काटेकोर व मार्मिक आहे. असे समीक्षा वाचत असताना कोठेही जाणवत नाही. आपली समीक्षा परिपूर्ण आहे. याची कबुली द्यायला ते तयार नाहीत. इतर टीकाकारांविषयी बोलतानाही वा. ल. कुलकर्णी म्हणतात की टीकाकार हा सर्वज्ञ नसतो. तो रसज्ञच असतो.

टीकाकार टीका करताना सर्वज्ञाची भूमिका घेऊन टीका करतो की, रसज्ञतेची भूमिका घेऊन टीका करतो. यासाठी स्वत: श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची वाड;मयावर केलेली टीका वा. लं. नी अभ्यासली.

जेव्हा वा. लं. नी श्रीपाद कृष्णांच्या वाड;मयावर टीका केली तेव्हा वा. ल. टीकाकार या नात्याने म्हणतात की, हा श्रीपाद कृष्णांच्या वाड;मयाचा संपूर्ण अभ्यास नाही ह्याची मला जाणीव आहे. हा केवळ त्या दृष्टीने केलेला एक छोटासा प्रयत्न आहे. प्रत्येक ग्रंथकार हे एक गूढच असते त्याचे वाड;मय हे गूढ उकलण्यासाठी जणू आपणांस प्रतिक्षणी आव्हान देत असते. आव्हान स्वीकारण्यात एक प्रकारची मौज असते. कोणत्याही ग्रंथकाराच्या वाड;मयातील गूढ अगदी संपूर्णपणे कोणीच उलगडू शकत नाही. खरे म्हणजे वाड;मयाच्या ठिकाणी असणाऱ्या अंगभूत सामर्थ्याचेच ते एक लक्षण आहे. पण मला वाटते हे गूढ आपण संपूर्णपणे उकलू अशी कोणाचीच प्रतिज्ञा नसते. आपले टीकालेखन म्हणजे त्या दृष्टीने केलेला आस्थापूर्वक प्रयत्न असतो. त्यात काय काय हाती लागते. ते स्वत: न्याहाळण्यात व मग दुसऱ्याला दाखविण्यात एक प्रकारचा आनंद असतो. हे हस्तलिखित पूर्ण करित असता हा आनंद मी चाखला. वरील वा. लं. च्या समीक्षेविषयीच्या विचारावरुन असे दिसून येते की, वाड;मयीन टीकाकार हा सर्वज्ञ असू शकत

नाही. तो रसज्ञ असतो. वाड;मयीन टीकाकार स्वत: वाड;मय कृतीचा रस चाखता चाखता दुसऱ्याला तो रसाचा आनंद चाखायला देत असतो.

सामान्य वाचक व टीकाकार ह्यांचे संबंध मोठे गमतीचे असतात. टीकाकार हा आपले वाड;मयपरीक्षणात्मक लेख सर्व सामान्य वाचकांच्या हिताकरिता त्यांच्या उद्बोधनाकरिता त्यांना आपल्या वाचकांसाठी पुस्तके निवडणे सोयीचे जावे ह्या दृष्टीने लिहित असतो. असे समजण्यात येते. हे एक दृष्टीने बरोबर आहे कारण जोपर्यंत तो हे आपले टीकालेख किंवा परीक्षणे नियतकालिकांतून प्रसिद्‌ध करीत असतो. तोपर्यंत त्यांच्या सर्वसामान्य वाचकांना फायदा बरोबर ठरतो. परंतु मौज अशी आहे की, सर्वसामान्य वाचकाला गोंधळून टकाण्यापलीकडे हे टीकालेख किंवा परीक्षण लेख आज तरी फारसे साधू शकत नाहीत असा अनुभव आहे. त्यापासून फायदा होतच असेल तर जे वाड;मयाचे अभ्यासक असतात. काही वेळा टीकालेखन सर्वसामान्य वाचकांच्या डोक्यावरुन जाते. काही वेळा असे लिहिले. परंतु बहुदा नेहमीच असे होते असे म्हणावयास हरकत नाही. इतर जे टीकालेखन भराभर नियतकालिकांत भराभर प्रसिद्‌ध होतात. सर्वसामान्य  वाचकाला गोंधळात टाकण्याखेरीज काही करीत नाहीत हे परीक्षणलेख चांगले असतात. परंतु बराच वेळ वाचकाला गोंधळात टाकणारे असतात.

टीकाकाराच्या वाड;मयीन अभिरुचीला बालपणापासून सतत वाचनाने, मननाने व चर्चेने एक प्रकारचे वळण लागलेले असते. तो वाड;मय ह्या विषयात प्रगल्भ झालेला असतो. म्हणूनच तो जे लिहितो किंवा बोलतो तेव्हा त्यांच्या बोलण्यात व लिहिण्यात असा काही भाग असतोच की, जो ह्या सर्वसामान्य वाचकाच्या अवाक्या बाहेरचा आहे असा अनुभव येतो.

सर्वसामान्य वाचकाची टीकाकाराविषयी अशी तक्रार असते की, परीक्षणकाराच्या लिखाणात तोचतोपणा आलेला असतो. एका पुस्तकावरील अभिप्रायात त्याने वापरलेले शब्द प्रयोग व केलेली विधाने ही अगदी जशीच्या तशी दुसऱ्या पुस्तकावरील त्याच्या अभिप्रायात काही अठवड्यानंतर परत वाचायला मिळतात. त्यामुळे तरतम ठरविणे आपल्याला अशक्य परंतु सर्वसामान्य वाचकाची तक्रार अगदी रास्त आहे. असे वाटते मग ह्यातून मार्ग काय? वा. लं.च्या मते राजमार्ग आहे स्वत: वाचकाने स्वत:च परीक्षणकार बनणे आपल्या आवडीची वाचकाने पुस्तके वाचावीत आणि हवे असल्यास परीक्षण टीकालेखानाचा उपयोग करुन घ्यावा परंतु त्यावर अवलंबून राहू नये. ऐकावे जनाचे करावे मनाचे सर्वसामान्य वाचकांनी ह्या परीक्षणलेखकांकडून फारशा अपेक्षा करु नयेत.

टीकाकार हे खरोखरच व्यासंगी व तज्ञ असतात. परंतु ते थोडेफार अहंभावाने पछाडलेले असतात. परंतु ह्या खेरीज अर्धवट, मूर्ख परीक्षणकारांचा वर्गही काही थोडा नसतो. हे लोक ऐनकेन प्रकाराने टीकाकर बनलेले असतात. नियतकालिकांच्या सृष्टीत असले उपटसुंभ बरेच असतात. वर्तमानपत्री व्यवसायात पडल्यामुळे इतर कामाबरोबर हेही काम त्यांच्याकडे आलेले असते. इतर कामाप्रमाणे हेही काम झेपेल तसेच करीत असतात. हातात असलेल्या लेखणीचा ते उपयोग करीत असता आपण काय करतो आहे याची दिक्कत त्यांना नसते. ते ज्या काळात लिहित असतात त्या काळातील वाड;मय घाईघाईत वाचलेले असते. अन्य भाषेतील वाड;मय घाईघाईत वाचूनही झालले नसते त्यांचे लेखन शेर वजा व बिनबुडी असते. पुष्कळवेळा समोरच्या पुस्तकातील मजकूर जाणून घेण्या इतकी बुद्‌धिमत्ताही त्यांच्याकडे नसते. लेखकाच्या म्हणण्याचा

आपल्या परीक्षणलेखात विपर्यास्त करतात. ह्या दृष्टीने एक कुचेष्टेचा विषय होतो.

वामनराव जोशी म्हणतात की, टीकाकाराची भूमिका वाड;मयशोधकाची असते. बोधकाची नसते. एखाद्या पुस्तकाचे परीक्षण म्हणजे त्या ग्रंथातील गुणदोषणांचे जाहीर संकीर्णतनच असते.

वा. लं. नी स्वत: टीका केली ती रसज्ञ बनूनच याचा प्रत्यय वारंवार येतो. आणि आपल्या टीकेमध्ये मधूनमधून आपण सर्वज्ञ कसे बनू शकत नाही. सर्वज्ञतेला बाधा येण्याची शक्यता असते. एखाद्या टीकाकाराला सर्वज्ञ बनून टीका करण्यात कसकशा अडचणी येतात. आणि या अडचणीवर टीकाकाराला मात करणे कठिण असते. तेव्हा नाईलाजाने रसज्ञ बनूनच लेखन कृतीच्या वाचनाचा आस्वाद घेत घेत टीकाकार टीकेची आपली भूमिका वठवीत असतो.

टीकाकार टीका करतान पृथक्करण विकलन करण्यात आणि प्रत्येक घटनेचे नियम बसविण्यात प्रवीण असलेली त्यांची बुद्धी तर्क अनुमानादि साधने घेऊनच ललितकृतीकडे वळते व तिचे नियम शोधून काढतो. ललितकृतीतील सौंदर्य नियमांत न बसण्यासारखे असते. निदान त्या सौंदर्यातील महत्वाचा भाग हा तर्क अनुमानादी साधनातील निष्कर्षिलेल्या नियमांत बसण्यासारखा कधीच नसतो. व ह्या भागाचा फार जपून विचार करावा लागतो.

वा. ल. कुलकर्णी काही दिवसांपूर्वी एका राजकीय म्हणून समजल्या जाणाऱ्या कादंबरीचे परीक्षण करावयास म्हणून बसलो व मनापुढे असा प्रश्न उभा राहिला की, ह्या कादंबरीच्या कोणत्या अंगाचे परीक्षण करणार? तिच्या ललितांगाचे की, तिच्यातील विषयाचे? ती कादंबरी म्हणून त्यांनी वाचली, तेव्हा कथा किंवा कादंबरी ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ज्या ललितकृती असतात. त्यांच्याच आधारे माझ्यासमोरील कृतीचे मी विश्लेषण करावयास पाहिजे. होय की नाही. मग असे विश्लेषण करतांना माझे लक्ष मूलत: कोणकोणत्या गोष्टींकडे खरोखर असावयास पाहिजे ? अर्थात खालील प्रश्नांकडेच ना ? कादंबरीकाराने आपल्या कृतीत लालित्य म्हणजेच सौंदर्य कितपत आणलेले आहे ? हे सौंदर्य त्या कृतीत उतरविताना त्याने आजपर्यंतच्या सौंदर्यनिर्मितीच्या पारंपारिक पध्दतीची मदत घेतली. केवळ अंशत: घेतलेली असल्यास त्याने स्वत:चे असे वेगळे तंत्र वापरले असणार तेव्हा ह्या त्याच्या स्वतंत्र तंत्राचे स्वरुप काय आहे? बरे हे सौंदर्य साधनेचे कार्य त्याच्या हातून नीटसे घडलेले नाही. असे आढळल्यास ह्या गोष्टींस त्याचे असे कोणते दोष कारण आहेत? हे दोष निदान वरून दिसावयाला तरी तंत्रदोषच असणार. तेव्हा त्याचे स्वरुप स्पष्ट करीता येण्यासारखे आहेत. ह्यावर कदाचित असे प्रतिपादण्यात येईल की, वरून दिसावयास केवळ तंत्रदोष म्हणून जे आपणांस वाटतात ते खरोखर पाहू गेले असता लेखकाच्या अपरिपक्व अनुभूतीतून जन्मलेले अतएव मूलभूत स्वरुपाचे असे दोष असतात. तेव्हा त्यांच्या स्वरुपाची चर्चा ही केवळ तंत्रदृष्ट्या करून कसे चालेल हे प्रतिपादन अगदी यथार्थ आहे याबद्दल संशय नाही. परंतु परीक्षणकाराच्या दृष्टीने विचार करू जाता असे आढळेल की, तो जी अनुमाने काढणार ती त्यांच्या समोरील दृश्य कृतीवरूनच काढणार असल्यामुळे लेखकाच्या मूळ अनुभूतीच्या तीव्रतेबद्दल फार तर संशय व्यक्त करण्यापलीकडे तो ह्या ठिकाणी फारसे काही करू शकणार नाही. कारण त्याने काढलेली तत्संबंधीची अनुमाने भरपूर पुराव्याभावी थोडी फार लंगडीच ठरणार, तेव्हा त्याला भर दूयावा लागणार तो मूळ अनुभूतीच्या तीव्रतीव्रतेची विचिकित्सा करण्यावर नव्हे तर त्या अनुभूतीतून ते जन्माला आले. त्यांच्या स्वरुपावरुन सुरुपतेवर व कुरुपतेवर सुरुपता असल्यास

ती कोणत्या गोष्टीमुळे आली ह्यावर व कुरुपता असल्यास ती कलानिर्मितीबाबतच्या कोणत्या नियमाचे उल्लंघन केल्यामुळे तेथे अवतरली. यावर त्याचप्रमाणे कोणत्या गोष्टीचा अवलंब केला असता हे दोष टळू शकले असते. हेही तो सुचवू शकेल. हे त्याच्या ललित सौंदर्य साधनाबाबतचे ज्ञानावर अवलंबून राहील. म्हणजे त्याची चर्चा ही पुष्कळशी तंत्रदृष्ट्या नाही का ? होणार? तो ह्याचीही विचिकित्सा करु शकेल की जे तंत्र लेखकाने आपल्या कृतीत वापरले आहे. किंवा खरे म्हणावयाचे म्हणजे ते तंत्र लेखकाकडून त्यांच्या कृतीत वापरले गेले आहे कारण पुष्कळ वेळा हे कार्य अभावितपणे घडत असते. ते कथा वस्तुतः उपकारक ठरेल ? ह्या ठिकाणी अर्थातच त्यांच्या प्रस्तुत कादंबरीतील कथा वस्तुंच्या स्वरुपाचे विश्लेषण होईल. नाही असे नाही परंतु ह्या विश्लेषणाचे स्वरुप कोणत्या प्रकारचे असेल हे आपणास येईल तो असे पाहिल की कथावस्तु ही खरोखर कथा वस्तु व्हावयास योग्य आहे काय? ती कितपत अर्थपूर्ण आहे ? ती एका कलाकृतीचा विषय होण्यास कितपत समर्थ आहे ? ती कादंबरीचा विषय होऊ शकते काय ? का ललित वाड;मय दुसऱ्या कोणत्यातरी प्रकारचा विषय व्हावयास पाहिजे ? तो कदाचित असे दाखवू शकेल की, प्रस्तुत ललित कृतीत वापरलेले तंत्र हे त्या विशिष्ट कथा वस्तुला उपकारक ठरत नाही. तर मारक ठरते. त्यामुळे रसनिर्मितीऐवजी रसभंग होतो. म्हणजेच तो जी चर्चा करणार ती कथा वस्तुची, कलादृष्ट्या व सौंदर्य दृष्ट्या प्रयोजकतेविषयी व अप्रयोजकतेविषयी होय. समाजदृष्ट्या, व्यवहारदृष्ट्या, नैतिकदृष्ट्या, राजकीयदृष्ट्या वा इतर कोणत्या दृष्टीने त्यात या कथावस्तुंच्या प्रयोजकतेसंबंधी वा अप्रयोजकतेविषयी विचार करावयाचे कारण नाही असेच नाही का ?.

हे झाले परीक्षणकाराच्या दृष्टीने. परंतु सर्वसामान्य वाचकांची या परीक्षणाकडे व टीकालेखाकडे पाहण्याची दृष्टी कोणत्या प्रकारची असते ?. त्याची त्याबाबत काही अपेक्षा असते ? परीक्षण लेखकाने पुस्तकांच्या केवळ ललितांगाचे आपल्या कुवतीप्रमाणे परीक्षण केल्यास सामान्य वाचक त्यावर खुष होतात काय ? जरी सर्वसामान्य वाचक ललित वाड;मय प्रायः स्वतःच्या करमणुकीसाठी वाचत असले तरी परीक्षण लेखातून केवळ याच प्रश्नाची, याच अंगाची चर्चा अपेक्षीत असते काय ? मूळ लेखकाने आपल्या कृतीत अकर्षकपणा आणलेला असल्यास तो कोणत्या युक्त्या प्रयुक्त्याने आणला. व आणला नसल्यास कोणत्या युक्त्यांच्या अवलंबन केल्यामुळे हुकला याची विचिकित्सा आपल्या परिने परीक्षण लेखण कितीही केले तरी सर्वसामान्य वाचकांचे त्यामुळे समाधान होत नाही. मग त्याला काय हवे असते त्याची अशी अपेक्षा असते की, त्या ललितकृतीत जो विषय अवतरलेला असेल अमुक कादंबरी अमुक विषयावर आहे, सदर लघुकथा कोणत्या विषयावर लिहलेली आहे ? अशा प्रकारचे प्रश्न व उत्तरे आपण हरघडी ऐकतोच नाही का ? त्याची चर्चा परीक्षण लेखकाने करावी म्हणजे असे की, त्याविषयाचे सदर ललितकृतीत झालेले चित्रण हे वस्तुस्थितीला धरुन आहे की नाही? त्यामध्ये काही ठिकाणी सत्याचा अपलाप केलेला आहे काय ? वैगेरे तत्संबंधी प्रश्नांची उत्तरे त्याने आपल्या परीक्षण लेखातून द्यायला हवी. उदाहरण घेतल्याने हे म्हणणे जास्त स्पष्ट होण्यासारखे आहे. तेव्हा अशी कल्पना करु की, एखाद्या कादंबरीत काही तत्कालिन राजकारणातील घटनांचे चित्र आहे. तेव्हा हे चित्रण कलात्मकरितीने कादंबरीकाराने केलेले आहे की नाही एवढेच जर परीक्षणकाराने चर्चिले तर वाचकांचे समाधान होणार नाही. वाचक असे म्हणणार की या घटना प्रत्यक्ष घडलेल्या आहेत काय ? घडलेल्या असल्यास त्याची नोंद लेखकाने यथातथ्यपणे केलेली आहे

काय? व इतर प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी परीक्षण लेखकाने तत्कालिन राजकारणाच्या इतिहासाचा प्रथम अभ्यास करावा. व मगच प्रस्तुत पुस्तकाचे लेखन करावे. सारांश ललित कृतीत जो विषय या दृष्ट्या का होईना परंतु अवतरतो, त्या विषयासंबंधी संपूर्ण ज्ञान परीक्षणकारास अवश्यमेव असावयास हवे. त्याने त्याविषयीची मांडणी कशी झाली आहे. एवढे सांगितले असता आमचे भागावयाचे नाही. असे त्यांचे म्हणणे असते. तो काही वेळा यांच्याही पुढे जातो. व असे म्हणतो की, प्रस्तुत ललितकृतीत जो विषय अवतरला असेल तो समाजस्थैर्याला हितकारक आहे की अपकारक आहे. त्याची नैतिकदृष्ट्या योग्यता काय आहे. समाजाच्या पारंपारिक नितिमत्तेला त्यामुळे कोठे बाधा येते आहे काय. वैगैरे परीक्षणकारोन आपल्या लिखानातून चर्चावियास हवे म्हणजे त्याविषयीचे नैतिकदृष्ट्या मूल्यमापन करणे हे ही परीक्षणकाराचे एक कर्तव्य आहे.

याचा अर्थ असा की सर्वसामान्य वाचकांच्या दृष्टीने ललित वाड;मयाचा परीक्षक हा केवळ वाड;मयभ्यासक व सौंदर्यसमीक्षक असून चालत नाही. तर तो समाजशास्त्रज्ञही असावा लागतो. त्याला नीतिशास्त्राचे ज्ञान असावयास हवे. त्याने राजकारणाचा अभ्यास करावयास हवा व तो इतिहास संशोधक ही असल्यास चांगले सारांश त्याने निदान वाटेल त्या विषयाचा अभ्यास करण्याची तयारी तरी दाखवावयास पाहिजे व ज्या वेळेस ज्या विषयाच्या ज्ञानाची आवश्यकता असेल त्यावेळी त्याने त्या विषयावरील ज्ञान संपादून मगच आपले परीक्षण कार्य हाती घ्यावयास हवे. त्याला केवळ वाड;मयाच्या इतिहासाचे ज्ञान असून उपयोगी नाही. त्या ज्ञानाच्या जोरावर तो फार झाल्यास आपल्या हातातील पुस्तकाचे वाड;मयाच्या इतिहासातील नक्की करु शकेल. ललितकृतीचे सौंदर्यदृष्ट्या मूल्यमापन करुन तिच्या योग्यतेची कमी अधिक उंची ठरवील. परंतु त्यापासून आमचा म्हणजे तत्कालिन समाजाचा म्हणजेच सर्वसामान्य वाचकवर्गाचा काय फायदा ? त्यामुळे वाचकांना थोडाच योग्य व्यवहारिक सल्ला मिळणार आहे तो योग्य सल्ला देण्यास समर्थ होण्यासाठी परीक्षकाने प्रथम निरनिराळ्या शास्त्रांचे ज्ञान संपादवयास हवे व मगच आपले परीक्षणकार्य करावयास हवे. असेच अप्रत्यक्षपणे सर्वसामान्य वाचकांचे म्हणणे असते.

एखाद्या ग्रंथाचे वाड;मयाच्या स्थानकाळचं निश्चित करणार असतो. तेव्हा तीही कामगिरी परीक्षणकार कितपत बजावू शकेल ह्याबद्दल संशयच आहे तो फार झाल्यास आपल्या विशिष्ट मूल्यमापनाने ह्या कामगिरीस थोडा फार हातभार लावील. परंतु ते ही काम ती फारसे करु शकत नाही. असे एकंदर जगाच्या वाड;मयेतिहासाकडे पाहिले असता आढळून येते. परंतु हा प्रश्न बाजूला ठेवला व वर निर्देशलेली सर्वसामान्य वाचकांच्या इतर अपेक्षा लक्षात घेतल्या की, आपली छाती दडपून जाते. व ह्या वाचकवर्गाकडून परीक्षणलेखकांवर जी जबाबदारी लादण्यात येते ती प्रथम समर्थनीय आहे काय ? हा प्रश्न विचारावासा वाटतो व ती समर्थनीय आहे असे ठरल्यास ती जबाबदारी लादण्यात येते.

प्रथम ही जबाबदारी अशा रितीने त्यावर लादणे हे समर्थनीय आहे असे जे प्रतिपादण्यात येते. त्यांना काय म्हणावयाचे असते ते पाहू. त्यांना असे म्हणावयाचे असते की, ज्या अर्थी मनुष्याचे सर्व व्यवहार हे ललितवाड;मयाचे विषय होऊ शकतात. त्या अर्थी ह्या व्यवहारांचे चित्रण हे कोणत्याही प्रकारचा विपर्यास होऊ न देता त्या ललितकृतीतून झालेले आहे की नाही हे परीक्षण लेखकाने पहावयास नको काय? त्याने ते अवश्यमेव पहावयास हवे व एवढ्यासाठी त्याना या सर्व मानवी व्यवहाराचे सूक्ष्म ज्ञान असणे आवश्यक

आहे शिवाय ज्या अर्थी 'ललित' लेखकांकडून हा जो एकंदर वाड;मय व्यापार घडतो. तो आमच्यासाठी म्हणजेच आमच्या सुखासाठी होय. त्या अर्थी त्यामुळे आम्हांस खरोखरंच सुख मिळू शकेल की नाही. हे आम्हांस एखाद्या शहाण्याने समजून सांगावयास नको काय? ज्यावर आमचे अंतिम कल्याण अवलंबून आहे. अशा गोष्टींशी जर त्या वाड;मयकृतीतील विषयांचा संबंध असेल आणि तो तसाच असणार हे काय सांगावयास पाहिजे? तर मग आमचे हिताहित लक्षात घेऊन त्याची छाननी व्हावयास नको काय? दूराव्याने का होईना त्यात आमच्या अंतिम हिताच्या दृष्टीने व समाजस्थैर्याच्या दृष्टीने काही अनिष्ट भाग आढळल्यास त्याची त्याने आम्हास जाणीव करुन दयावयास नको काय? एकंदर समाजाच्यावतीने बोलणाऱ्या वाचकवर्गाचे हे म्हणणे सकृतदर्शनी बिनतोड वाटते. परंतु त्यातून सूचित होणारी परीक्षणकाराच्या पूर्वतयारीची अजस्त्रता घ्यावी आली की, ते थोडेसे चमत्कारही भासू लागले. गरीब बिचारा परीक्षणलेखक त्यांच्यावर सर्वज्ञतेचा आरोप जर ही मंडळी करु लागली तर तो त्यापेक्षा लेखनसंन्यास अधिक पसंत करेल. तो म्हणेल हे काम माझ्याच्याने जमणे शक्य नाही. मी ही एक सर्वसामान्य मनुष्य आहे व एकंदर मनुष्यजातीच्या ज्ञानाला ज्या नैसर्गिक मर्यादा आहेत. त्या माझ्या ही ज्ञानाला आहेत. तेव्हा तुम्हाला मजकडून सर्व विषयांवर समतोल ज्ञान गर्भ मते ऐकावयास मिळणार नाहीत व तशीच ती ऐकावयास मिळावी असा जर तुमचा हट्ट असेल तर मी आपला लेखन संन्यास पत्करतो कसा आणि त्याचे ही हे म्हणणे तितकेच बिनतोड आहे असे ह्या वाचकवर्गास आढळून येईल.

असा हा दिसावयास तरी पेचप्रसंग आहे. परंतु तो तसा पेचप्रसंग आहे म्हणून तो सुटेपर्यंत पुस्कांची परीक्षणे येण्याची थांबली आहेत असे नाही. ती येतच आहेत व सर्वसामान्य वाचक ही वाचून त्यावर टीका करण्याचा आपला हक्क गाजवीत आहे ती भागविणे अशक्य आहे हे तर खरेच परंतु तेच विचार अन्यरितीने करीता येण्यासारखा आहे. ललितवाड;मयाचा विषय मानवी जीवन हे असले तरी ललितवाड;मय हे त्या जीवनाचे कलात्मक चित्रण करण्याकरीता निर्माण होत असल्यामुळे त्याचा परीघ कला परीक्षेच्या व सौंदर्यपरीक्षेच्या नियमांनुसार झाला पाहिजे. हे उघड आहे ती जर तशी झाली नाही तर ललितकृती व ललितेवर कृती यांची परीक्षा एकाच फुटपट्टीने होऊ लागेल व त्यामुळे कलेचा दर्जा खालाविल्याशिवाय राहणार नाही. ह्या सौंदर्यचर्चेमध्ये कलावस्तूला किती महत्व द्यावयाचे ते वरच एके ठिकाणी सूचित केले आहे. येथे एवढेच लिहिले असता पुरे की सौंदर्यपरीक्षेत सौंदर्य वस्तूला व कलाविषयाला जरी महत्व असले तरी ते एकंदर समाजाच्या हिताहिताच्या दृष्टीने नसते. वाचकांच्या, रसिकांच्या, श्रोत्यांच्या व प्रेक्षकांच्या व्यवहारिक सुखाच्या दृष्टीने नसते. तर त्या कलाकृतीच्या हिताच्या दृष्टीने सौंदर्याच्याच दृष्टीने करावयाची असते. म्हणजे असे की, विशिष्ट कलाविषय हा सौंदर्यनिर्मितीला कितीसा उपकारक ठरला व उपकारक ठरला त्या विषयांमध्ये त्या विशिष्ट कलाकृतीची अशी कोणती बीजे मूलतःच आहेत की, ज्यांची अचूकपणे अभिव्यक्ती करुन त्यांना विशिष्ट आकार देण्यात कलावंताने दर्शविलेल्या सौंदर्यदृष्टीबद्दल आपण त्याचे सहर्ष अभिनंदन करावे? किंवा त्या बीजाचा भलत्याच रितीने उपयोग केल्याने सौंदर्यहानी केल्याबद्दल त्याचा निषेध करावा? एवढ्यापुरतीच म्हणजे कलाविषयाचा कलाकृतीच्या अंतिम सौंदर्याशी जेवढा संबंध पोचतो तेवढ्या पुरतीच कला विषयाची चर्चा परीक्षण लेखकाने केली असता त्याचे त्याबाबतचे कर्तव्य संपेल असे विचार करीता वाटते. समाज शास्त्रदृष्ट्या, राज्यशास्त्रदृष्ट्या, नीतिशास्त्रदृष्ट्या किंवा इतिहासदृष्ट्या

त्या ललितकृतीचे मूल्यमापन करणे हे त्याचे कर्तव्य नाही ते कार्य साधले जावे असे जर वाचक वर्गास वाटत असेल तर त्यांनी एखाद्या समाजशास्त्रज्ञाचे, राज्यशास्त्रज्ञाचे, इतिहास संशोधकाचे व नीतिशास्त्र विशारदाचे पाय धरावेत व त्याच्याकडून ते कार्य करवून घ्यावे. त्या कार्याची योग्यता कमी आहे असे येथे दर्शविणयाचा हेतू नाही.

अशा रीतीने विचार करु लागलो असता हा प्रश्न सुटल्यासारखा वाटतो. एखादूया कवीच्या काव्यात आलेली निसर्ग वर्णनेही एखाद्या वनस्पती शास्त्रज्ञानाकडूनही तपासून, पारखून घेता येतील त्याप्रमाणे ती पारखून घ्यावयास काहीच हरकत नाही. एवढेच नव्हे तर ती शक्य असल्यास अवश्य पारखून घ्यावीत. परंतु हे काम त्या काव्याच्या ललित टीकाकाराकडून व्हावे असा हट्ट धरल्यास तो कितीसा समजण्याचा ठरेल? प्रत्येक ललितकृतीचा विषय तिच्यापासून निराळा केला की, ललितेतर होत असतो. व अशा रितीने तिच्यापासून वेगळा करून जर त्या विषय तज्ञाने तो समाजहिताच्या दृष्टीने चर्चावयास घेतला तर त्यापासून वाचकांचा व लेखकांचाही फायदा झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु जो ललित टीकाकार तो विषय हा त्या ललितकृतीचा एक अभेद्य घटक समजतो किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे ललितकृतीपासून अविभाज्य समजतो. त्याने त्याची एकंदर कलाकृतीच्या सौंदर्याच्यादृष्टीने चर्चा करण्याऐवजी ललितेतर दृष्टीने छाननी म्हणून का करावी? त्याने ती तशी न करण्यातच त्याचे वैशिष्ट्य आहे व ह्याच वैशिष्ट्यांची अपेक्षा त्याच्याकडून सामान्य वाचकांनी करावयास हवी. शिवाय वरील तत्व लक्षात न घेता एखादूया ललितकृतीतील विषयाची तो ललितकृतीपासून वेगळा करुन समीक्षकाने चर्चा करावी असे जर आपण प्रतिपादू लागलो तर त्यापासून दुसरा एक अनर्थ ओढवण्याचा संभव असतो. त्यामुळे मग असे होते की हळूहळू समीक्षकाच्या दृष्टीने कलाकृतीपेक्षा तिच्या तथाकथित विषयालाच जास्त महत्व मिळू लागते. कलेच्या व वाड;मयाच्या प्रातांत कलामूल्यांपेक्षा व वाड;मयीन मूल्यांपेक्षा इतर मूल्यानांच अधिक भाव येतो. काही काळानंतर त्यांची मजल येथेपर्यंत येऊन पोचते की जो विषय समाजाच्या हिताच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळ्याचा असेल अशा एखादूया विषयावर लिहिल्या गेलेल्या कृतीला ती ललित अतएव सौंदर्यकृती आहे की नाही हे लक्षात न घेता ती केवळ त्या विषयांवर लिहिली गेली. ह्या कारणांसाठी समीक्षक श्रेष्ठत्व देऊ लागतो व त्याच कारणांसाठी ज्या विषयाचा संबंध साक्षात समाज हिताशी प्रत्यक्षपणे नाही. उदा:- एखादूया फुलावरील कवितेतील फूल घ्या त्या विषयावरील कृतीस ती ललितकृती असून तो कनिष्ठत्व देतो.

ही प्रथा एकंदर अनिष्टच नाही का? उद्या महायुध्द व हिंदुस्थान ह्या विषयांवर एखादूया लेखकाने काही लिखाण केले. त्यास कादंबरी हे नाव दिले. व त्या लिखितात महायुध्द व हिंदुस्थान ह्या विषयांची त्याने कितीही यथार्थपणे माहिती दिलेली असली तरी ललित टीकाकारांचे पहिले कर्तव्य ते पुस्तक कादंबरी ह्या अभिधानास योग्य आहे की नाही ह्याची चर्चा करणे हेच नाही का ठरणार? साने गुरुजींच्या वाड;मयात समाजातील अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न अवतरलेले असतील परंतु त्यांच्या वाड;मयाची ललितवाड;मय ह्या दृष्टीने परीक्षण करताना केवळ त्या विषयांना महत्व देऊन कसे भागेल? ललितकृती ही अन्तर्बाह्य सुसंगत पाहिजे. सुसंगती दर्शन हाच तिचा जीवनहेतू .ललितकृती ही अन्तर्बाह्य सुसंगत पाहिजे. तेव्हा ललितकृतीतून सूचित होणाऱ्या अर्न्तबाह्य सुसंगतीचे समीक्षण करणे हेच ललित टीकाकाराचे कर्तव्य ठरणार.

अशा प्रकारे वा. ल. कुलकर्णी यांनी वाङ;मयीन टीकाकार सर्वज्ञ की रसज्ञ? या प्रश्नाचे उत्तर सविस्तर मुद्देसूद मांडून सर्वसामान्य वाचकाच्या आणि परीक्षणकाराच्या टीकाकाराबद्दलच्या अपेक्षा मांडून ललितकृतीचे स्वरुप कसे आहे आणि ते कसे असावयाला पाहिजे व वाङ;मयीन टीकाकार सर्वज्ञ का नसतो? याची चर्चा केलेली आहे आणि या सर्व चर्चेवरुन वाङ;मयीन टीकाकार रसज्ञच असतो व असला पाहिजे असे उत्तर वा. लं.ना सापडते.

*******

## संदर्भ


१) वा. ल. कुलकर्णी साहित्य, साहित्य स्वरुप आणि समीक्षा, पहिली आवृत्ती १९७५, रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ४०० ०३४. पृष्ठ क्र. १५५

२) तत्रैव पृष्ठ क्र. १५५

३) वा. ल. कुलकर्णी, श्रीपाद कृष्ण वाङ;मयदर्शन पहिली आवृत्ती, १ जून १९५९, रामदास भटकळ पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी, ताडदेव रोड, मुंबई ४०० ०३४. पृष्ठ क्र. १०

४) वा. ल. कुलकर्णी, वाङ;मयीन मते आणि मतभेद पृष्ठ क्र. ११३

५) वा. ल. कुलकर्णी, वाङ;मयातील वादस्थळे पहिली आवृत्ती १९४६ ग. श. भटकळ १९४६ पृष्ठ क्र. १५९

६) तत्रैव पृष्ठ क्र. १६१

७) तत्रैव पृष्ठ क्र. १६१

८) तत्रैव पृष्ठ क्र. १६४

९) तत्रैव पृष्ठ क्र. १६६